**राज्यातील शाळांच्या स्थलांतर धोरणात सुधारणा करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः माशास्थ ३३२१/प्र.क्र.४०१/एसएम-१**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २८ जुलै, २०२१

**संदर्भ :**

१) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र: माशास्थ-२००८/(८६०/०८)/माशि-१, दि. १७/०२/२००९
२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र: माशास्थ-२००८/(८६०/०८)/माशि-१, दि. ०९/०६/२०१०
३) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र: माशास्थ-२०१२/(५९/१२)/माशि-२, दि. ३१/०७/२०१३
४) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण १११४/प्र.क्र.१३०/एसएम-१, दि. ०५/०६/२०१४

**प्रस्तावना :-**

१. राज्यातील सर्व विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळण्यासाठी शासनाने सर्वदूर शाळा उपलब्ध करुन दिल्या आहेत. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या व खाजगी व्यवस्थापनामार्फतही राज्यात सुमारे १ लाख १० हजार शाळा कार्यरत आहेत. अनुदानित तसेच विनाअनुदानित शाळांसोबतच स्वयंअर्थसहाय्यित शाळा देखील राज्यात मोठ्या प्रमाणात कार्यरत आहेत.
२. उपरोक्त नमूद विविध व्यवस्थापन, माध्यम व अनुदान पद्धतीच्या शाळांचे स्थलांतर योग्य पद्धतीने व्हावे, यासाठी शासनाने वेळोवेळी उचित कार्यपद्धती विहीत करुन दिली आहे.
३. नैसर्गिक आपत्ती/विविध विकास प्रकल्प/शाळांच्या जीर्ण इमारती/जागामालकाकडून भाडेकरार संपुष्टात आणणे/भाड्याच्या इमारतीमधून संस्थेच्या स्वत:च्या जागी जाण्याची गरज/भौतिक सुविधांच्या बाबतीत कालांतराने बदलणारे निकष/वाढत्या विद्यार्थी संख्येमुळे अपु-या पडणा-या भौतिक सुविधा इ. कारणांमुळे शाळांचे स्थलांतर करावे लागते. याशिवाय आदिवासी, दुर्गम व डोंगराळ भागात शाळांची गरज भागविण्यासाठी शाळांच्या स्थलांतराची मागणी लोकप्रतिनिधींकडून केली जाते. तसेच जागांच्या सततच्या वाढणा-या किंमती/जागांची उपलब्धता/वाढते शहरीकरण इ. कारणांमुळे स्थलांतर धोरणात बदल करण्याची गरज निर्माण झाली आहे. सबब राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांच्या स्थलांतर धोरणात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

उपरोक्त सर्व संबंधित बाबींचा साकल्याने विचार करुन आतापर्यंतचे शासन निर्णय अधिक्रमित करुन शाळांच्या स्थलांतरासाठी पुढील निकषांप्रमाणे कार्यवाही करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

**१) राज्यातील सर्व व्यवस्थापनांच्या व सर्व माध्यमाच्या शाळांना खाली नमूद परिस्थिती सोडून इतर कोणत्याही कारणास्तव स्थलांतराची परवानगी देता येणार नाही.:-**

I. शाळेची इमारत धोकादायक/जीर्ण होणे.

II. शाळा नैसर्गिक आपत्तीमध्ये क्षतिग्रस्त झाल्याने किंवा प्रकल्पामुळे बाधित झाल्याने करावे लागणारे अनिवार्य स्थलांतर.

III. अपु-या भौतिक सुविधा असलेल्या इमारतीमधून स्वयंपूर्ण इमारतीमध्ये स्थलांतर.

IV. विद्यार्थीसंख्येत वाढ होत असल्याने अपु-या पडणा-या भौतिक सुविधा.

V. जागामालकाकडून भाडेकरार संपुष्टात आणणे.

VI. भाड्याच्या इमारतीमधून संस्थेच्या स्वत:च्या जागेत जाण्याची गरज.

**२) स्थलांतराची परवानगी देण्यापूर्वी खालील बाबींची पूर्तता होणे आवश्यक राहील.**

I. अपवादात्मक परिस्थितीबाबत संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला.

II. स्थलांतराचे अंतराबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रमाणपत्र.

III. शाळा ज्या ठिकाणाहून स्थलांतरीत होणार आहे, त्या ठिकाणच्या स्थानिक स्वराज्य संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र.

IV. शाळा जेथे स्थलांतरीत करावयाची आहे तेथे इमारत (संस्थेच्या स्वत:च्या मालकीची अथवा भाड्याची) व इतर सर्व बाबी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ मध्ये नमूद विहीत निकषांप्रमाणे असणे.

V. अनुदानित/अंशत: अनुदानित शाळांच्या बाबतीत रिक्त पदे अतिरिक्त शिक्षकांचे समायोजनाने भरणे अनिवार्य असेल.

VI. नवीन ठिकाणी स्थलांतर केल्याने आरटीई नुसार आवश्यक असणा-या सर्व सुविधांमध्ये गुणात्मक वाढ होत असल्याबाबतचे पुरावे म्हणून जुन्या सुविधा व नव्या सुविधा यांची तुलनात्मक छायाचित्रे जोडणे आवश्यक राहील.

VII. शासन विहीत करेल त्याप्रमाणे शुल्क भरणे.

**३) स्थलांतर प्रकरणी विचारात घ्यावयाच्या इतर महत्त्वपूर्ण बाबी:-**

I. शाळेतील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांना (कायम व तात्पुरत्या सेवेतील) स्थलांतरीत ठिकाणी सामावून घ्यावे लागेल.

II. स्थलांतरापूर्वीचे ठिकाणी विद्यार्थ्यांची शिक्षणाची सोय झाली आहे याची खात्री करणे आवश्यक राहील.

III. अनुदानित/अंशत: अनुदानित शाळांच्या स्थलांतराच्या बाबतीत विद्यार्थ्यांची स्थलांतराच्या ठिकाणी कोणतीही गैरसोय होऊ नये तसेच विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या शैक्षणिक व भौतिक सुविधांचा गुणात्मक दर्जा वाढेल याची दक्षता घेण्यात यावी.

४) ज्या ठिकाणी शाळा स्थलांतरीत करावयाची आहे ते ठिकाण पूर्वीच्या जागेपासून प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेकरीता अनुक्रमे ५, १०, २० कि.मी. पेक्षा जास्त अंतरावर असू नये.

५) आदिवासी, दुर्गम व डोंगराळ, नक्षलग्रस्त भागातील गरज भागविण्यासाठी करावयाच्या स्थलांतर प्रकरणी उपरोक्त निकषांत सूट देण्याचा अधिकार शासनास राहील.

६) अपवादात्मक परिस्थितीत प्रकरणाच्या गुणवत्तेनुसार उपरोक्त निकषांत सूट देण्याचा अधिकार शासनास राहील.

७) शाळेचे प्रस्तावित ठिकाणी स्थलांतर झाल्यानंतर पटसंख्या/सरासरी हजेरी यामध्ये कोणतीही सूट दिली जाणार नाही.

८) अनुदानित शाळा स्थलांतरीत होत असल्यास स्थलांतरापूर्वीच्या ठिकाणी अन्य अनुदानित शाळा उपलब्ध असावी.

९) स्थलांतर प्रस्ताव शिक्षण अधिकारी/प्रशासन अधिकारी (शिक्षण) यांनी परिशिष्ट-१ येथील तपासणी सूचीनुसार तपासणी करुन विभागीय शिक्षण उपसंचालक यांना सादर करावा व त्यावर विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी त्यांच्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह शासनास प्रस्ताव सादर करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२१०७२८१६२५३९८९२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( इ. मु. काझी )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१. मा.मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
२. मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
३. मा. मंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
४. मा. राज्यमंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
५. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
६. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
७. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
८. शिक्षण संचालक (प्राथमिक/ माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
९. विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)
१०.शिक्षणाधिकारी (प्राथमिक/ माध्यमिक), जिल्हा परिषद (सर्व)
११.प्रशासन अधिकारी (शिक्षण)(सर्व)
११. निवडनस्ती ( एसएम-१)

## परिशिष्ट-१

## (शाळा स्थलांतरासाठी तपासणी सूची)

१) संस्थेचे नाव

२) शाळेचे नाव व ठिकाण

३) शाळा परवानगी आदेशाचा क्रमांक व दिनांक

४) स्थलांतराचे प्रस्तावित ठिकाण

५) मूळ ठिकाणापासून स्थलांतराचे अंतराबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाचे / स्थानिक स्वराज्य संस्थेचे (शहरी भागासाठी) प्रमाणपत्र

६) स्थलांतराचे कारण

७) सदर शाळा अल्पसंख्याक संस्थेव्दारे संचलित असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र

८) शाळेचा प्रकार (अनुदानित/अंशत: अनुदानित/विनाअनुदानित/स्वयंअर्थसहाय्यित)

९) शाळेचे माध्यम

१०) शाळा ज्या ठिकाणाहून स्थलांतरीत होणार आहे त्या ठिकाणच्या स्थानिक स्वराज्य संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र

११) शाळेतील विद्यार्थ्यांचे समायोजन कोणत्या शाळेत करण्यात येणार आहे याबाबतचे संस्थेचे शपथपत्र

१२) सर्व सदस्यांच्या स्वाक्षरीसह ठराव

१३) अद्ययावत शाळा तपासणी अहवाल (सद्य:स्थितीत शाळेत किती वर्ग आणि किती विद्यार्थी आहेत या माहितीसह)

१४) विद्यार्थ्यांच्या आधार क्रमांकाची यादी व छायाप्रती

१५) शाळेची सरल ऑनलाइन माहिती (फायनल रिपोर्ट)

१६) शाळेचे मागील ३ वर्षांचे यु-डायस रिपोर्ट

१७) शाळेचे मागील ३ वर्षांचे संचमान्यता आदेश

१८) कार्यरत शिक्षकांची यादी / मस्टर

१९) शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांची ना-हरकत प्रमाणपत्रे

२०) संस्था/शाळेबाबत न्यायालयीन प्रकरण सुरु आहे काय याबाबतचे बॉंडपेपरवरील नोटराईज्ड शपथपत्र

२१) शासनाकडून शाळा, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, वेतन/वेतनेतर अनुदान, तुकडया, विद्यार्थी इ. बाबत वेळोवेळी विहित करण्यात येणारे अधिनियम, नियम, शासन निर्णय व आदेशांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील, याबाबत संस्थेचे अध्यक्ष/सचिव यांचे बॉंडपेपरवरील नोटराईज्ड शपथपत्र

२२) ज्या अटीवर शाळेस परवानगी दिली आहे त्या अटींमध्ये स्थलांतरानंतर बदल होणार नाही, तसेच शाळेस अनुदानाच्या ज्या मूळ तत्वावर परवानगी आहे, त्याच अनुदानाच्या तत्वावर चालविण्याबाबत संस्थेचे बाँडपेपरवरील नोटराईज्ड शपथपत्र

२३) कार्यरत पात्रताधारक शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांचे समायोजन करण्यात येईल व त्यांच्या सेवाशर्तीत बदल केले जाणार नाहीत, याबाबत संस्थेचे अध्यक्ष/ सचिव यांचे बाँडपेपरवरील नोटराईज्ड शपथपत्र

२४) आर.टी.ई. ॲक्ट, २००९ अनुसार व याबाबत वेळोवेळी देण्यात येणाऱ्या शासन आदेशानुसार आवश्यक सर्व भौतिक सुविधा व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत संस्थेचे अध्यक्ष/सचिव यांचे बाँडपेपरवरील नोटराईज्ड शपथपत्र

२५) शाळा अनुदानित/अंशत: अनुदानित/विनाअनुदानित असल्यास, शासन निर्णय, दिनांक २८.८.२०१५ मधील संचमान्यतेच्या सुधारीत निकषांनुसार व याबाबत शासनाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या आदेशानुसार अनुज्ञेय पदांइतके शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी कार्यरत राहतील व त्यापेक्षा जास्त शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी कार्यरत राहणार नाहीत तसेच अनुज्ञेय पदांपैकी रिक्त पदे अतिरिक्त कर्मचाऱ्यांमधून भरण्याबाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल, याबाबत संस्थेचे अध्यक्ष/सचिव यांचे बाँडपेपरवरील नोटराईज्ड शपथपत्र

२६) मूळ ठिकाणी तसेच स्थलांतराच्या ठिकाणी उपलब्ध असलेल्या भौतिक सुविधांची छायाचित्रे- (उदा. इमारत, वर्गखोल्या, मुख्याध्यापकांची खोली, प्रयोगशाळा, संगणक कक्ष, क्रिडांगण, रॅम्प, मुला-मुलींची स्वतंत्र स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी, कम्पाऊंड वॉल इ.)

२७) स्थलांतरीत ठिकाणचा भाडेकरार व जागा/ इमारत भाडेकराराची/ मालकीची असल्यास त्याची कागदपत्रे (उदा.७*१२, मालमत्ता पत्रक, टॅक्स पावती इ.)

२८) शासन विहीत करील त्याप्रमाणे शुल्क